# रे.दि.मु.नं.११०/२०१२ मधील नि.८२ वरील आदेश

## (पांडुरंग विरुध्द प्रकाश)

**CNR MHSN-14000332-2012**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील प्रतिवादी नं.३ यांच्या बेलिफ रिपोर्टवरुन ते दिनांक १५/०२/२०१४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रतिवादी नं.३ यांच्या नावापुढे मयत असे लिहून अर्ज कलम २ प्रमाणे त्यांचे कायदेशीर वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. सदर दाव्याचा अंतिम न्यायनिवाडा गुण दोषावर होण्यासाठी दाव्यात अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदरच्या दावा दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट अर्जातील मागणीप्रमाणे दावा दुरुस्ती करण्यास परवानगी न मिळाल्यास वादीचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होणारे आहे. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जावरच म्हणणे सादर करुन सदरचा अर्ज नि.क्र.७८ व नि.क्र.८० च्या आदेशावर अवलंबून आहे. त्यामुळे नि.क्र.७८ व नि.क्र.८० सोबत सदर अर्जाची चौकशी व्हावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीच्या विरुध्द निरंतर ताकिदीसाठी दाखल केलेला आहे. बेलिफ रिपोर्टवरुन प्रतिवादी नं.३ हे मयत असल्याचे दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्यातील भांडण हे स्थावर मिळकतीशी संबंधित असल्याने प्रतिवादी नं.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद हा अंतिमः गुण दोषावर निकाली काढण्यास मदत होईल. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता, या न्यायालयाला दाव्याच्या कोणत्याही स्टेजवर वादी अथवा प्रतिवादी यांना दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्याचा अधिकार आहे. अशा स्वरुपाची दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यापूर्वी मे. न्यायालय काही अटी किंवा शर्ती घालू शकते. सदरच्या अटी व शर्ती या वादी व प्रतिवादी यांच्यातील मूळ वाद विषयाचा न्यायनिवाडा करण्याच्या अनुषंगाने घालणे आवश्यक आहे. परंतू सदर नियमा अन्वये पुढे असेही नमूद करण्यात आलेले आहे की, दाव्याची चौकशी चालू झाल्यानंतर अशा स्वरुपाची दुरुस्ती करणेची परवानगी मे. न्यायालय देऊ शकत नाही. ज्यावेळी मे. न्यायालय या मतास येते की, दाव्यातील पक्षकारांनी आवश्यक ती काळजी घेतलेली नाही. त्यावेळी मे. न्यायालय अशा स्वरुपाचे अर्ज नामंजूर करु शकते. परंतू

प्रस्तुत दाव्याचा विचार करता, प्रस्तुतचा दावा हा अदयाप न्यायचौकशीस लागल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे दाव्यातील परिस्थितीचा विचार करता प्रतिवादी नं.३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी व त्या अनुषंगाने दावा दुरुस्ती करण्यासाठी योग्य व न्याय राहिल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्ज कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी नं.३ याचे वारस दावा दुरुस्ती करुन रेकॉर्डवर घ्यावेत.

३. अर्जाचा खर्च म्हणून वादीने प्रतिवादीस र.रु.५००/- दयावेत.

४. वादीने मुदतीत दावा दुरुस्ती न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल.

सही/-

दिनांक १९/०६/२०१९ (एच. एस. सातपुते)

शिराळा सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा